<u>अति तात्काळ :</u>

प्रति,

सर्व प्रशासकीय कार्यासन अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय,
गृह विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय
प्रमुख. [महामंडळासहीत].

क्रमांक: एसडीओ–१०९३/२१७०/सीआर–१४५/ एसडीओ–४.  गृह विभाग, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.
दिनांक:– २४ नोव्हेंबर, १९९४.

विषय : शासकीय सेवेत मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांची गाऱ्हाणी/निवेदने यावर विनाविलंब कार्यवाही करण्याबाबत तसेच आरक्षण विषयक आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत–शिस्तभंग विषयक कार्यवाही.

संदर्भ : या विभागाचे पत्र समक्रमांक, दिनांक २९ ऑक्टोबर, १९९३ कृपया पहावे.

....

महोदय,

या विभागाच्या उपरोक्त नमूद संदर्भाधीन पत्रासोबत सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. बीसीसी–१०९३/६०१/प्र.क्र. १२७/९३/१६–ब, दि. २८.७.९३ ची प्रत आपणास पाठविण्यात आली आहे., व सदर परिपत्रकांत त्या विभागाने केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व वेळोवेळी सामान्य प्रशासन विभागाने तसेच इतरांनी माहिती मागितली असता एक महिन्याच्या आत पाठविण्याची दक्षता घ्यावी अशी विनंती करण्यात आली होती. तसेच संबंधित प्रशासकीय कार्यासनांनाही विनंती करण्यात आली होती.

२. सदर परिपत्रकात जे अधिकारी सेवाविषयक बाबींच्या आदेशांच्या अंमलबजावणी संदर्भात दुर्लक्ष करतील किंवा निष्काळजीपणा दाखवतील असे संबंधित अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील. सक्षम अधिकाऱ्याने शासकीय आदेशाप्रमाणे कार्यवाही न करणाऱ्या त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांविरुद्ध नियमाप्रमाणे शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करावी व त्याची माहिती सामान्य प्रशासन विभागास कळवावी असे स्पष्टपणे नमूद केले आहे. परंतु या बाबतीत आपणाकडून केलेल्या कार्यवाहीबाबत काहीच माहिती समजली नाही. याबाबत सामान्य प्रशासन विभाग सारखी स्मरणपत्रे पाठवित आहे. तरी आपल्याकडे माहिती उपलब्ध असल्यास व नसल्यास तसेच ८ दिवसांच्या आंत सामान्य प्रशासन विभागाला पाठविण्यासाठी या कार्यासनाकडे विनाविलंब पाठवून देण्याची व्यवस्था करण्यात यावी. आपल्या सोईसाठी सोबत सा.प्र.वि.च्या दि. २८.७.१९९३ च्या परिपत्रकाची झेरॉक्स प्रत पाठवित आहे. तरी सदर माहिती तात्काळ पाठविण्यास विनंती करण्यात येत आहे.

आपला,
सही/–
[अरुण भालेराव]
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

रलवी/७१२९४